# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.05.2026** **वार: मंगळवार**

---

1. 'क्वाड' देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची आज नवी दिल्लीत बैठक
2. राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्लीत पद्म सन्मान प्रदान; महाराष्ट्रातल्या आठ मान्यवरांचा सन्मान
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा येत्या काही दिवसात देशांच्या सीमा भागांचा दौरा करणार आणि
4. आयपीएल स्पर्धेतील पात्रता फेरीचा पहिला सामना आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स संघात रंगणार

**क्वाड**

'क्वाड' समूह देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक आज नवी दिल्लीत होणार आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर या बैठकीचं यजमानपद भूषवतील. या बैठकीत ऑस्ट्रेलियाच्या परराष्ट्र मंत्री पेनी वोंग, जपानचे परराष्ट्र मंत्री तोशिमित्सू मोतेगी आणि अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो सहभागी होतील. या बैठकीत 'क्वाड'च्या सध्या सुरू असलेल्या उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येईल तसंच हिंद-प्रशांत क्षेत्रातील अलीकडील घडामोडी आणि परस्पर हिताच्या इतर आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करण्यात येईल. जागतिक हितासाठी एक सकारात्मक शक्ती म्हणून काम करण्यासाठी तसंच समृद्ध, मुक्त आणि सर्वसमावेशक हिंद-प्रशांत क्षेत्रासाठी 'क्वाड' राष्ट्रे एकत्र आली आहेत. या गटाचं सध्याचं अध्यक्षपद भारताकडं असल्यानं भारत या बैठकीचं यजमानपद भूषवत आहे.

**पद्म वितरण**

राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल यंदाचे पद्म सन्मान प्रदान करण्यात आले. पद्म पुरस्कार वितरणाच्या पहिल्या टप्प्यातील सोहळ्यात राष्ट्रपतींनी 66 मान्यवरांना 'पद्म' पुरस्कारांनी सन्मानित केलं. यात दोन 'पद्मविभूषण', सहा 'पद्मभूषण' आणि 58 'पद्मश्री' पुरस्कारांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यातील आठ मान्यवरांना काल 'पद्म' सन्मान प्रदान करण्यात आले. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यावेळी उपस्थित होते. कालच्या सोहळ्यात ख्यातनाम अभिनेते धर्मेंद्रसिंह देओल यांना त्यांच्या कला क्षेत्रातील योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मविभूषण देऊन सन्मानित करण्यात आलं. त्यांच्या पत्नी आणि लोकसभेतील खासदार हेमा मालिनी यांनी हा सन्मान स्वीकारला.

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पद्मभूषण प्रदान करण्यात आला. पद्मभूषण देऊन सन्मानित करण्यात आलेल्या राज्यातील मान्यवरांमध्ये उदय कोटक आणि पियूष पांडे यांचा समावेश आहे. पियूष पांडे यांना मरणोत्तर हा सन्मान प्रदान करण्यात आला.

परभणी इथले कृषीसेवक श्रीरंग देवबा ऊर्फ दादा लाड, अमरावती इथल्या श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दन पंत बोथे गुरुजी यांना पद्मश्री पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

पद्मश्री पुरस्कारानं गौरवण्यात आलेल्या इतर मानकऱ्यांमध्ये रामचंद्र आणि सुनिता गोडबोले, तमाशा कलावंत रघुवीर खेडकर, क्रिकेटपटू हरमनप्रीत कौर, दिव्यांग ॲथलीट प्रवीण कुमार यांचा समावेश आहे.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून सिक्कीमच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. आज संध्याकाळी त्या गंगटोक इथल्या 'नामग्याल इन्स्टिट्यूट ऑफ तिबेटोलॉजी' आणि ऑर्किडेरियम'ला भेट देणार आहेत. तसंच गंगटोक शहरात महिलांसाठी सुरू करण्यात येणाऱ्या पिंक बसला हिरवा झेंडा दाखवून त्यांचा शुभारंभ करतील. उद्या, त्या नाथू ला इथं भेट देऊन तिथं तैनात

असलेल्या सैनिकांशी संवाद साधतील. त्याच दिवशी, गंगटोक येथील सिक्कीम विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभालाही त्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी, गंगटोक इथल्या 'पालजोर मैदानावर आयोजित एका कार्यक्रमात, त्या सिक्कीम पोलिसांना 'राष्ट्रपतींचे पोलीस सन्मानचिन्ह' प्रदान करतील.

**<u>गृहमंत्री दौरा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा येत्या काही दिवसांत भारताच्या सीमा भागांचा दौरा करणार असून सुरक्षेशी संबंधित बैठकाही घेणार आहेत. काल रात्री ते राजस्थानमधल्या बिकानेर इथं पोहोचले. ते आज सकाळी सीमा सुरक्षा दलाच्या 'सांचू' सीमा चौकीला भेट देतील आणि सुरक्षा दलाच्या जवानांशी संवाद साधतील तसंच त्यांच्यासाठीच्या कल्याणकारी योजनांचं उद्घाटन करतील. आज दुपारी गृहमंत्री शाह बिकानेरमधील सीमावर्ती भागातील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतील. या बैठकीला केंद्रीय गृह मंत्रालय, राजस्थान सरकार आणि BSF चे अधिकारी, तसंच पाच सीमावर्ती जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक उपस्थित राहतील. याशिवाय गृहमंत्री शहा येत्या 29 मे रोजी भुज शहराला भेट देतील आणि तिथल्या BSF च्या एका सीमा चौकीचा दौरा करतील. तर येत्या पाच जूनला शाह त्रिपुराच्या सीमावर्ती भागांचा दौरा करतील; त्यानंतर, ते पश्चिम बंगालला भेट देऊन तिथल्या सीमावर्ती भागांचा दौरा करतील.

**<u>सीतारामन-मुंबई</u>**

देशाची अर्थव्यवस्था अंतर्गत पातळीवर मजबूत आहे, मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावरील भूराजकीय आणि आर्थिक संघर्षामुळे नवनवी आव्हानं निर्माण होत आहेत असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सिडबी अर्थात भारतीय लघु उद्योग विकास बँकेच्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पश्चिम आशियात संघर्ष सुरू झाल्यानं खतं, सोनं, इंधन या सर्व उत्पादनांचे आंतरराष्ट्रीय बाजारातले दर कडाडले आहेत, त्यामुळे देशाच्या परकीय चलनसाठ्यावर ताण येत आहे. सध्याच्या आव्हानावर मात करण्यासाठी सरकारनं केलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली. यावेळी विविध लाभार्थींना उद्योग व्यवसायांच्या वाढीसाठी सीतारामन यांच्या हस्ते अर्थ सहाय्य वितरित करण्यात आलं.

**<u>अमेरिका हल्ला</u>**

अमेरिकेच्या लष्करानं होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ इराणच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपण स्थळांना आणि बोटींना लक्ष्य करून आत्मसंरक्षणात्मक हल्ले केले. अमेरिकेने युद्धविरामाच्या वाटाघाटी सुरू केल्यानंतर काही तासांतच ही घडामोड घडली आहे. युद्धविरामादरम्यान सैनिकांचे संरक्षण करताना अमेरिकी सैन्य संयमाने वागत असून हे हल्ले क्षेपणास्त्र प्रक्षेपण स्थळांवर आणि सुरुंग पेरण्याचा प्रयत्न करणाऱ्या इराणी बोटींवर करण्यात आले, असं सेंटकॉमचे प्रवक्ते टिमोथी हॉकिन्स यांनी सांगितलं आहे.

**<u>ट्रम्प-इराण</u>**

दरम्यान इराणसोबतचे युद्ध संपवण्यासाठीच्या कोणत्याही करारामध्ये सौदी अरेबियासह अन्य देशांनी अब्राहम करारात सामील होण्याची अट समाविष्ट असावी, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. इराणसोबतच्या वाटाघाटी चांगल्या प्रकारे सुरू आहेत, परंतु, एकतर सर्वांसाठी एक उत्तम करार होईल किंवा कोणताही करार होणार नाही, करार न झाल्यास पुन्हा युद्धभूमीवर गोळीबार सुरू होऊ शकतो, आणि तो पूर्वीपेक्षा अधिक मोठा आणि अधिक तीव्र असेल, असा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे. अब्राहम करार हे ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळातील अमेरिकेच्या मध्यस्थीनं झालेले करार आहेत, ज्यांचा उद्देश इस्रायल आणि अनेक अरब आणि मुस्लिम-बहुल देशांमधील संबंध सामान्य करणे हा आहे. दरम्यान, अमेरिकेसोबतच्या चर्चेत थोडी प्रगती झाली आहे, परंतु करार तत्काळ होण्याची शक्यता नाही, असं इराणनं म्हटलं आहे.

**<u>हज</u>**

भारतासह जगभरातील लाखो नागरिक आज सौदी अरेबियामध्ये हज यात्रेसाठी जमले आहेत. पाच दिवसांच्या हज यात्रेसाठी 'मीना' इथल्या तंबूंच्या शहरात हज यात्री एकत्र आले. आज पूर्ण दिवस हे हज यात्री अराफ़ात मैदानात प्रार्थना करतील, त्यानंतर उद्या मीना इथं प्रतीकात्मक पद्धतीनं कुर्बानीची प्रथा पूर्ण केली जाईल.

**सीएनजी**

सीएनजीच्या दरात प्रतिकिलो दोन रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. आज सकाळी 6 वाजल्यापासून हे नवे दर लागू झाले असून, त्यामुळे दिल्लीत आता सीएनजीचा दर प्रति किलो 83 रुपये 9 पैसे झाला आहे.

**आयुष**

सरकार योग आणि निसर्गोपचाराच्या माध्यमातून देशभरात प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा मजबूत करत आहे, असं प्रतिपादन आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी काल नवी दिल्ली इथं केलं. आयुष मंत्रालयाच्या संसदीय सल्लागार समितीची चौथी बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत भारतात योग आणि निसर्गोपचार क्षेत्राच्या विस्तार तसंच आरोग्य-कल्याणाच्या प्रसाराशी आणि पारंपरिक आरोग्यपद्धतींच्या जागतिक उपक्रमांवर चर्चा करण्यात आली.

**आपत्ती निवारण**

जम्मू आणि काश्मीरमधील गुलमर्ग गोंडोला इथल्या केबल कार प्रणालीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे अडकलेल्या सर्व पर्यटकांची सुटका करण्यात आली आहे. लष्कर, पोलिस, राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती निवारण दलानं एकत्रितपणे या ठिकाणी बचाव कार्य राबवलं. मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

**शिक्षण मंत्री**

येत्या 21 जूनला होणाऱ्या 'NEET (UG) 2026' या पुनर्परीक्षेसाठी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र लिहून या परीक्षा सुरक्षित, निर्धोक आणि यशस्वीपणे पार पाडण्याचं आवाहन केलं आहे. प्रधान यांनी देशातील सर्व मुख्यमंत्री, नायब राज्यपाल आणि प्रशासकांना पत्र लिहून, या संदर्भात सहकार्य करण्याची मागणी केली आहे.

**क्रिकेट**

आयपीएल स्पर्धेत गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ आणि गुजरात टायटन्स या संघात आज धर्मशाला इथं पात्रता फेरीचा पहिला सामना होणार आहे. या सामन्यातील विजेता संघ आयपीएल 2026च्या अंतिम फेरीत प्रवेश करेल, तर पराभूत संघाला दुसऱ्या पात्रता सामन्यात आणखी एक संधी मिळेल. उद्या, संध्याकाळी साडे सात वाजता मोहाली इथं होणाऱ्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादची लढत राजस्थान रॉयल्सशी होईल. या सामन्यात पराभूत होणारा संघ स्पर्धेतून बाहेर पडेल, तर विजयी संघ दुसऱ्या पात्रता फेरीत प्रवेश करेल.

**मॉन्सून**

नैऋत्य मोसमी पाऊस आज केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. मान्सून साधारणपणे 1 जून रोजी केरळमध्ये दाखल होतो, तो यंदा काहीसा आधीच केरळकडे सरकत आहे. त्यामुळे आज केरळच्या चार जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# या बरोबरच हे ऱाष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.